**भुसंपादन-** भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ४ खालील अधिसुचना प्रसिध्द करणे, कलम ५ अ ची चौकशी करणे, कलम ६ खालील अधिसुचना प्रसिध्द करणे, कलम ९(३)(४) खालील चौकशी करणे, कलम ११ खाली अंतिम निवाडा तयार करणे, कलम १२ खाली अंतिम निवाडा जाहीर करणे, संपादित जमीनीचे हितसंबंधीताना मोबदला रक्कमेचे वाटप करणे, भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ४ अंतर्गत संपादनाखालील अधिसुचीत जमीनीचे हितसंबंधीत व्यक्तीची चौकशी करणे व सुनावणी देणे, कलम ९(३)(४) अंतर्गत हितसंबधीत व्यक्तींना नोटीसा बजावुन हरकती व सुचना मागविणे व प्राप्त झालेल्या हरकतीवर सुनावणी देणे, कलम १२ अंतर्गत निवाडा घोषीत करणे, कलम १८ अंतर्गत वाढीव मोबदला करीता दाखल झालेले संदर्भ तपासुन जिल्हा न्यायालयाकडे सादर करणे, कलम २९ व ३० अंतर्गत वादातील प्रकरणामध्ये न्यायालयात संदर्भ दाखल करणे इत्यादी कामकाज या शाखेतून चालतात.